# मेट्रो ३ प्रकल्प! ५ किमीचे भुयारीकरण पूर्ण

मुंबई, प्रतिनिधी - कुलाबा -वांद्रे -सीप्झ मुंबई मेट्रो ३ प्रकल्पातील ५१०० मीटर लांबीच्या भुयारीकरणाचे काम आतापर्यंत पूर्ण झाल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मंगळवारी जाहीर केले. शहरातील पहिल्या संपूर्ण भुयारी मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी एमएमआरसीद्वारे करण्यात येत असून विविध ठिकाणच्या टीबीएम लॉन्चिंग शाफ्टद्वारे टनेल बोरिंग मशिन्स भूगर्भात सोडून भुयारीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. मेट्रो ३ प्रकल्पासाठी एकूण १७ टीबीएमची आवश्यकता असून त्या सर्वांची कारखाना स्वीकृती चाचणी यशस्वीपणे पूर्ण झाली आहे. त्यापैकी १५ मशिन्स मुंबईत दाखल झाली असून ८ मशिन्स पूर्णतः कार्यान्वित झाली आहेत. अजून ३ मशिन्स भूगर्भात सोडण्याचे काम सध्या सुरू आहे. तर २ टीबीएम जुलै महिन्या अखेरीस जमिनीत सोडण्यात येतील. उर्वरित टीबीएम सप्टेंबरपर्यंत शाफ्टमध्ये उतरविण्यात येतील. यासंदर्भात बोलताना एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे म्हणाल्या की, भुयारीकरणाचे काम सुरू झाल्यापासून १ वर्षाच्या आतच ५ किमी लांबीच्या भुयाराचे काम पूर्ण झाल्याचा आनंद होत असल्याचे म्हणाल्या. मेट्रो ३ प्रकल्पात अप आणि डाऊन असे दोन्हीं भुयारी मार्ग विचारात घेता एकूण ५२ किमीचे भुयारीकरण अपेक्षित आहे. सध्या ८ टीबीएम आठवड्याला ३५० मीटर या गतीने भुयारे खणत आहेत. हा वेग ऑक्टोबर २०१८ पासून प्रति आठवडा ७०० ते ८०० मीटर जाण्याची शक्यता आहे. पॅकेज ७ मधील टीबीएम सर्वप्रथम भुयार पूर्ण करून सप्टेंबर २०१८ मध्ये ब्रेकथ्रू साध्य करणे अपेक्षित आहे.